# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. २
## सभावृत्तांत

दिनांक :- २०/५/२०१५ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २०/५/२०१५ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४. मा.लोंढे गणेश नारायण
५. मा.को-हाळे अनंत सुभाष
६. मा. शिदे शितल उर्फ विजय गोरख
७. मा.जगताप विमलताई सुरेश
८. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानेश्वर
९. मा.बारणे निलेश हिरामण
१०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
११. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१२. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१३. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. सुभाष सावन माछरे - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव -,.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. रविंद्र दुधेकर - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एस.एस.मोरे – कार्यकारी अभियंता विदयुत , मा. के.डी.फुटाणे - उप अभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.व्ही.एन.देसले- उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग मा.एम.एम.चव्हाण, उपअभियंता, विदयुत विभाग, ,मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, , मा.जे.एन.जानकार – सहा.आरोग्याधिकारी, मा.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, मा. व्ही.ए शेलार – हॉल्टीकल्चर सुपरवायझर, उदयान विभाग, श्री.आर.बी.चांदेरे, - उदयान सहाय्यक , उदयान विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. १३, दि.२५/३/२०१५, व कार्यपत्रि का क्र. १ दि. १०/४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २ प्रभाग क्रमांक २० मधील चौकास नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ३ पावसाळा जवळ आला असून प्रभागात असणा-या सर्व स्ट्रॉमवॉटर लाईन निट करणेस व पाणी नदीमध्ये जाण्यासाठी असणा-या सर्व अडचणी दुरुस्त्या करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ४ खोदकाम करुन केबल टाकण्यासाठी परवानगी देण्या आधी खोदकामाच्या पुर्ण जागेची माहीती त्या त्या प्रभागाच्या सभेमध्ये देवून त्याची पुर्ण माहिती नगरसदस्यांना देवून त्यांची परवानगी प्रभागामार्फत धेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ५ विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ६ चिंचवड येथील गांधीपेठमधील सार्वजनिक मुतारी निष्कासीत करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

ठराव क्र. ३ विषय क्र. १
दि. २०/५/२०१५ विभाग : विदयुत –ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.यमुनाताई पवार अनुमोदक: मा. आशाताई सुर्यवशी

संदर्भ :- क्र.बक्षे/वि/जा/१७९/२०१५, दिनांक ११/५/२०१५ रोजीचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव..

प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ध्वनीक्षेपण यंत्रणेची वार्षीक चलन देखभाल अपेक्षीत खर्च रक्कम रुपये १०,००,०००/- चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४ विषय क्र. २
दि. २०/५/२०१५ विभाग : स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.आशाताई सुर्यवंशी अनुमोदक: मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ :- मा.आशाताई सुर्यवंशी यांचा दि. २०/५/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

१) प्रभाग क्रमांक २० मधील बिजलीनगर हनुमान मंदीर समोरील चौकास श्री हरी ओम चौक व चौक सुशीकरण करुन नामकरण करणेस तसेच २) प्रभाग क्रमांक २० मधील बिजलीनगर पाण्याच्या टाकी समोरील चौकाचे सुशोभीकरण करुन चौकास भगवान श्री १००८ भगवान पार्श्वनाथ चौक असे नामकरण करण्याकामीचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ५ विषय क्र. ३
दि. २०/५/२०१५ विभाग : आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.अनंत को-हाळे अनुमोदक: मा.विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक २०/५/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पावसाळा जवळ आला असून प्रभागात असणा-या सर्व स्ट्रॉमवॉटर लाईन निट करणेस व पाणी नदीमध्ये जाण्यासाठी असणा-या सर्व अडचणी दुरुस्त्या करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्र. ६ विषय क्र. ४
दि. २०/५/२०१५ विभाग : १.स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२. भूमी आणि जिंदगी विभाग
सुचक : मा.अनंत को-हाळे अनुमोदक: मा.विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक २०/५/२०१५ रोजीचा प्रस्ताव

खोदकाम करुन केबल टाकण्यासाठी परवानगी देण्या आधी खोदकामाच्या पुर्ण जागेची माहीती त्या त्या प्रभागाच्या सभेमध्ये देवून त्याची पुर्ण माहिती नगरसदस्यांना देवून त्यांची परवानगी प्रभागामार्फत घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्र. ७ विषय क्र. ५
दि. २०/५/२०१५ विभाग : १ बांधकाम परवानगी
व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण
विभाग २. नगररचना विभाग
सुचक : मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा.विनायक गायकवाड

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दिनांक २०/५/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने आजपर्यंत हजारो बांधकाम परवाने दिलेल्या आहेत या परवाने दिलेल्या बांधकामापैकी अनेक इमारतींना आजपर्यंत पुर्णत्वाचे दाखले मिळालेले नाहीत किंवा विकसकाने घेतलेले नाहीत. पाणीपुरवठा, जलनिसारण, अग्नीशामक, उदयान विभाग व मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाच्या अनेक अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे बांधकाम परवाना विभागाने या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिलेली नाहीत. विकसक मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करीत नाहीत. मंजूर सदनिकापेक्षा जास्त गाळे बनविले जातात. त्याची विक्री देखील अज्ञानी लोकांना केली जाते, इमारतीच्या पार्किंगमध्ये देखील व्यवसायीक गाळे काढली जातात, काही ठिकाणी बी.आर.टी. पार्किंगचा एफ.एस.आय.वापरुन देखील पार्किंग मनपाला हस्तांतरीत केली जात नाही. साईड मार्जिंग, फ्रंड मार्जिंगमध्ये देखील तफावत आढळते. विकसक हा सदनिका अथवा गाळेधारकांकडून सोसायटी बनविणे, अभिहस्तांतरण करणे, इत्यादीसाठी सदनिका धारकांकडून सर्व प्रकारचे चार्जेस वसुल करतो. परंतु यापैकी काही न करता अनाधीकृतपणे काही ठिकाणी विकसक सोसायटी नसल्यामुळे एन.ओ.सी.साठी जास्त

रक्कम फलॅटधारकांकडून वसुल करत असतात. या सदनिका धारकांना भोगवटापत्र न घेता भोगवटा करणेसाठी परवानगी देतो परंतु मनपाच्या नियमामध्ये दंडाची तरतुद शुल्लक स्वरुपाची असल्यामुळे विकसक देखील दंड भरुन टाकतो.  सदनिकाधारकांना ताबा देवून टाकतो. या सर्व प्रकारांमुळे याठीकाणी घरे घेणा-या नागरीकांना मानसिक व आर्थीक त्रास सहन करावा लागतो. तरी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात यावेत.

१. बांधकाम परवानगी विभागाकडून भाग पुर्णत्वा
२. चा दाखला देण्यात येवू नये.  जेणेकरुन विकसक बांधकाम चालु करणा-या प्रमाणपत्रातील सर्व व शर्तींचे पालन करतील व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करतील व त्यानंतर त्याठिकाणी भोगवटा करण्यासाठी सदनिकाधारक अथवा गाळाधारकांना परवानगी देईल.
३. भोगवटा प्रमाणपत्र न घेता विकसकाने अथवा अन्य कोणीही भोगवटा करण्यास सुरुवात केल्यास सदर बांधकाम अनाधिकृत घोषीत करावे. त्यासाठी संबंधीत विकसकाला जास्तीत जास्त दंडाची तरतुद करावी. फौजदारी कारवाई होण्याची तरतुद करावी.
४. यापुर्वी ज्या इमारतीमध्ये भोगवटा प्रमाणपत्ॅन घेता भोगवटा चालु असल्यास त्या विकसकास नवीन बांधकाम परवानगी घेताना तो ज्या प्रकल्पामध्ये वैयक्तीक अथवा भागीदारी / कंपनी अशा कोणत्याही प्रकारे सामील असल्यास त्यास जोपर्यंत पुर्वीच्या इमारतीना अथवा प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र घेणार नाही तोपर्यंत नवीन बांधकाम परवानगी देवू नये अशी तरतुद करावी.
५. मनपाने देखील बांधकाम परवानगी, नगररचना, पाणीपुरवठा, अग्नीशामक , जलनिसारण, उदयान विभाग या परवानगी देताना एकाच ठिकाणी या सर्व परवानगी मिळाव्यात अशाप्रकारची व्यवस्था करावी व सर्व परवानगी देण्यासाठी कालमर्यादा ठरविण्यात यावी.

तरी वरीलप्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेसंबंधी नगररचना व विकास विभाग आणि  बांधकाम परवानगी व अनाधिकृत नियंत्रण विभाग यांचे नियमानुसारचे अभिप्रायासह संबंधीत विषय समितीमार्फत मा.महापालिका सभा मान्यतेने शासनाकडे आवश्यक त्या मंजूरीकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे..

सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता  नियमानुसार संबंधीत विभागामार्फत  पुढील योग्य  ती कार्यवाही करणेत यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

-------

ठराव क्र. ८ विषय क्र. ६
दि. २०/५/२०१५ विभाग : १.स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२ भूमी जिंदगी विभाग
३.आरोग्य विभाग,

सुचक : मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा.आशाताई सुर्यंवशी

संदर्भ :- मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दिनांक २०/५/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ चिंचवड गावठाणामधील गांधी पेठ येथे सर्वात जुनी मुतारी असून तसेच वापर कमी असल्याने गैरवापर होत आहे. तसेच सदर परिसरात दुर्गंधीमुळे नागरीकांना त्रास होत आहे यास्तव सदर मुतारी काढून टाकणे (निष्कासीत) करणेसंबंधी पिंपरी चिंचवड शहर जिल्हा राष्ट्रवादी कॉग्रेस श्रीसुर्यकांत (नाना) थोरात, मोरया भुवन गांधीपेठ चिंचवडगांव , श्री. राजु उर्फ राजाभाऊ गोलांडे अध्यक्ष ब्लॉक कॉग्रेस (आय) कमिटी पश्चिम विभाग , आलमगीर शाही मशिद ट्रस्ट गांधीपेठ चिंचवडगांव, श्री.पोपटलाल नहार गांधीपेठ चिंचवडगांव इत्यादी यांनी अर्ज दिले असून आणि त्या परिसरातील स्थानिक नागरीक यांनीही निवेदन दिलेले आहेत. सदरचे वरीलप्रमाणेचे नागरीकांचे अर्ज व निवेदन छायांकित सोबत जोडलेले आहेत. तरी गांधीपेठ चिंचवडगांव येथील प्रभाग क्रमांक २२ मधील जुनी मुतारी निष्कासीत करणेकामीचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ ९६ /२०१५.
दिनांक : १२/ ०६ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना